# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदीरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे-४०१ १०१.
दुरध्वनी : २८१९ २८२८.

जा.क्र./मनपा/कर/ ५९ /२०१८-१९ दि.२१/ ८ /२०१८.

संगणक विभाग
आवक क्र: ९३१
दिनांक : २३/८/२०१८

प्रति,

**सिस्टीम मॅनेजर,**

मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय – जाहिर आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, दि.२२/१२/२०१० रोजीच्या महासभेतील ठराव क्र. ६५ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतीमध्ये पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर ऊर्जेचा वापर आणि इतर पारंपारिक ऊर्जास्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्च:चक्रण आणि पुर्नवापर किंवा पर्यावरणनुकुल अशा योजनांची अमलबजावणी केलेली आहे अशा इमारतींना मालमत्ता करात सुट देणेबाबतचे सोबत जोडलेले जाहिर आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

**कर निर्धारक व संकलक**
**मिभा भाईंदर महानगरपालिका**

सोबत – जाहिर आवाहन

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# कर विभाग

जा.क्र. मनपा/कर/५९/२०१८-१९
दि. २१/८/२०१८

## // जाहिर आवाहन //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना कळविण्यात येते की, दि.२२/१२/२०१० रोजीच्या महासभेतील ठराव क्र. ६५ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतीच्या बाबतीत पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर ऊर्जेचा वापर आणि इतर पारंपारिक ऊर्जास्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चःचक्रण आणि पुर्नवापर किंवा पर्यावरणनुकुल आणि परिस्थीतीकीय लाभदायक गृहनिर्माण संस्था अशा इमारतींना मालमत्ता करातून सुट देण्याबाबत मा. महासभेची मान्यता दि. २२/१२/२०१० रोजी मान्यता देण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या इमारतींनी वरीलप्रमाणे योजनांची अंमलबजावणी केलेली आहे अशा इमारतींनी जाहिर आवाहन प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसात उपरोक्त योजना चालू असल्याचे संबधित विभागाचे (पाणीपुरवठा/सार्व.बांधकाम/आरोग्य) प्रमाणपत्र सादर करावे अन्यथा सन २०१८-१९ च्या देयकात मालमत्ता करात सुट देण्यात येणार नाही असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(सही)

कर निर्धारक व संकलक
मिरा भाईंदर महानगरपालिका